# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पुनरूत्थान सहावा रविवार – ०५ मे २०२४

## श्रद्धावंताच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधू भगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा विश्वास बाळगू या.

प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रभूच्या प्रेमाचा संदेश जगभर घोषित करण्यासाठी पवित्र आत्म्याचे सामर्थ्य व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. ह्या निवडणुकीच्या काळात सर्व पक्षांना व उमेदवारांना आपल्या जाहीर नाम्यात फक्त घोषणाबाजी न करता प्रत्यक्षात पूर्ण करता येतील अशाच वचनांचा समावेश करण्यास प्रभूचे मार्गदर्शन लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. देव पित्याने आपल्या एकुलत्या एका पुत्राला आपल्या तारणासाठी दुःख सहन करण्यास पाठवून आपल्या असीम प्रेमाची ग्वाही दिली आहे. प्रभूवर व एकमेकांवर प्रेम करून प्रभूच्या या अमोल व अमर्यादित प्रेमाला प्रतिसाद देण्यास आपल्याला कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. परमेश्वराच्या प्रेमाचा आपल्याला सखोल अनुभव यावा व तोच अनुभव इतरांच्या सुख-दुःखात, आजारात पूर्णपणे समरस होऊन त्यांना तो देता यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. प्रभूच्या सामर्थ्यशाली कृपेद्वारे दु:खितांचे सांत्वन व्हावे, दुर्बल मनाच्या लोकांना आधार मिळावा, शोकग्रस्तांना दिलासा प्राप्त व्हावा, जगात सर्वत्र शांती नांदावी तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.